**अनधिकृत जाहिराती, घोषणा फलक, होर्डिंग, पोस्टर्स यासंदर्भात करावयाच्या कारवाईबाबत. मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्णयाची अंमलबजावणी.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्र. याचिका-२०१७/प्र.क्र. १३०/नवि-२२**
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : १८ फेब्रुवारी, २०१७

**परिपत्रक :-**

अनाधिकृत जाहिराती, घोषणा फलक, होर्डिंग, पोस्टर्स, बाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिका क्र. १५५/२०११, मे. सुस्वराज्य फाऊंडेशन, सातारा आणि इतर विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर या याचिकेवरील सुनावणीमध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक ३१.१.२०१७ रोजी विस्तृत निकाल दिलेला आहे.

२. मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या उपरोक्त आदेशामध्ये अनाधिकृत जाहिराती, घोषणा फलक, होर्डिंग, पोस्टर्स यावर कारवाई करण्याच्या दृष्टीकोनातून तसेच अनधिकृत जाहिरातींवर प्रतिबंध होण्याच्या दृष्टीकोनातून सदर याचिकेवर निर्णय देतांना सविस्तर निर्देश (Directions) दिलेले आहेत. मा. उच्च न्यायालयाचे दिनांक ३१.१.२०१७ रोजीचे आदेश मा. उच्च न्यायालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेले आहेत.

३. मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या सदरच्या निर्देशांनुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी महानगरपालिका, अन्य नागरी स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हाधिकारी व पोलिस विभागाची राहणार आहे.

४. प्रस्तुत प्रकरणी मा. उच्च न्यायालयास कार्यपूर्तता अहवाल सादर करावयाचा आहे. तसेच सदर निर्देशांचे अंमलबजावणी करण्यासाठी मा. उच्च न्यायालयाने कालमर्यादा विहीत केली आहे. त्या दृष्टीकोणातून मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांची तातडीने तसेच मा. न्यायालयाने ठरवून दिलेल्या कालावधीत तंतोतंत अंमलबजावणी करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास तातडीने सादर करावा.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून. त्याचा संकेतांक क्र. २०१७०२२०१७२१३२०३२५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjay Sharadchandra Gokhale

Digitally signed by Sanjay Sharadchandra Gokhale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=DEPUTY SECRETARY, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ab8a7eeedad158d24cf530f0d6b662808245be49a8459ed4c63961ebdc3cb9e1, cn=Sanjay Sharadchandra Gokhale
Date: 2017.02.22 11:45:59 +05'30'

**(सं.श. गोखले)**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**
आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई

यांना कळविण्यात येते की, मा. उच्च न्यायालयाचे दिनांक ३१.१.२०१७ चे आदेश आपल्या अधिपत्याखालील सर्व नागरी स्थनिक स्वराज्य संस्थांच्या निदर्शनास आणावे व मा. उच्च न्यायालयाच्या

**अनधिकृत जाहिराती, घोषणा फलक, होर्डिंग, पोस्टर्स यासंदर्भात करावयाच्या कारवाईबाबत.**
**मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या निर्णयाची अंमलबजावणी.**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग,**
शासन परिपत्रक क्र. याचिका-३०१७/प्र.क्र. १३०/नवि-२२
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : १८ फेब्रुवारी, २०१७

**परिपत्रक :-**

अनाधिकृत जाहिराती, घोषणा फलक, होर्डिंग, पोस्टर्स, बाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिका क्र. १५५/२०११, मे. सुस्वराज्य फाऊंडेशन, सातारा आणि इतर विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर या याचिकेवरील सुनावणीमध्ये मा. उच्च न्यायालयाने दिनांक ३१.१.२०१७ रोजी विस्तृत निकाल दिलेला आहे.

२. मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या उपरोक्त आदेशामध्ये अनाधिकृत जाहिराती, घोषणा फलक, होर्डिंग, पोस्टर्स यावर कारवाई करण्याच्या दृष्टीकोनातून तसेच अनधिकृत जाहिरातींवर प्रतिबंध होण्याच्या दृष्टीकोनातून सदर याचिकेवर निर्णय देतांना सविस्तर निर्देश (Directions) दिलेले आहेत. मा. उच्च न्यायालयाचे दिनांक ३१.१.२०१७ रोजीचे आदेश मा. उच्च न्यायालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेले आहेत.

३. मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या सदरच्या निर्देशांनुसार कार्यवाही करण्याची जबाबदारी महानगरपालिका, अन्य नागरी स्थानिक स्वराज्य संस्था, जिल्हाधिकारी व पोलिस विभागाची राहणार आहे.

४. प्रस्तुत प्रकरणी मा. उच्च न्यायालयास कार्यपूर्तता अहवाल सादर करावयाचा आहे. तसेच सदर निर्देशांच अंमलबजावणी करण्यासाठी मा. उच्च न्यायालयाने कालमर्यादा विहीत केली आहे. त्या दृष्टीकोणातून मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशांची तातडीने तसेच मा. न्यायालयाने ठरवून दिलेल्या कालावधीत तंतोतंत अंमलबजावणी करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास तातडीने सादर करावा.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संकेतांक क्र.२०१७०२२०१७२१३२०३२५ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

आपला,
( सं.श. गोखले )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

URGENT

Please brief me on the action taken

04/03/17

Directorate of Mun. Administration
Date 04 MAR 2017
Serial No. M 1814
Sign.......